


परिसंवाद म्हटले की मतमतांतरे ही ओघाने आलीच. (डावीकडून) प्रतीक पुरी, देवयानी अभ्यंकर, प्रा. मिलिंद जोशी, प्रदीप चंपानेरकर, रमेश राठिवडेकर आणि सुप्रिया लिमये.

# कालसुसंगत साहित्य उपलब्ध केले पाहिजे

## 'मटा मैफल'च्या परिसंवादातील सूर

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'मराठी साहित्याला आज शहरी व ग्रामीण भागातही मागणी आहे; परंतु लेखक, प्रकाशक आणि विक्रेते यांनीही आपल्या व्यवसायात कालानुरूप बदल केले पाहिजेत. आधुनिक माध्यमांचा स्वीकार करत अधिक दर्जेदार, कालसुसंगत साहित्य उपलब्ध करून दिले पाहिजे,' असा सूर रविवारी 'मटा मैफल'मध्ये आयोजित परिसंवादात व्यक्त झाला.

मैफलीच्या दुसऱ्या दिवशी 'मराठी साहित्य खपाऊ नाही काय?' या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात रोहन प्रकाशनचे प्रदीप चंपानेरकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशनच्या देवयानी अभ्यंकर, लेखक प्रा. डॉ. मिलिंद जोशी, 'अक्षरधारा'चे रमेश राठिवडेकर, 'न्यूज हंट'चे विशेष कार्यकारी अधिकारी प्रतीक पुरी आणि 'बुकगंगा'च्या सुप्रिया लिमये सहभागी झाल्या होत्या. 'मटा'चे मुख्य बातमीदार आशिष पेंडसे यांनी प्रास्ताविक केले, तर उत्तमकुमार इंदोरे यांनी सूत्रसंचालन केले.

'चांगल्या पुस्तकांना मागणी असतेच. गेल्या दहा-बारा वर्षांत मराठीतील प्रकाशकांची संख्या आणि प्रकाशित पुस्तकांची संख्याही वाढली आहे. वाचक आपले बजेट सांभाळून खरेदी करत आहेत. साहित्याशी संबंधित सर्वच घटकांनी पुस्तकांचा सर्वंकष दर्जा वाढवतानाच किमतीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. घरात ग्रंथसंपदेला असलेले महत्त्व मात्र कमी होत आहे,' असे चंपानेरकर यांनी सांगितले.

'मराठीचा वाचक टिकून असला, तरी मराठी साहित्याला काही भौगोलिक मर्यादा आहेत. केरळ, बंगालसारखी वाचनसंस्कृतीही आपल्याकडे फारशी दिसत नाही. काही बाह्य शक्तींच्या दबावांमुळे समकालीन सामाजिक विषयांवर पुस्तके निर्माण होत नाहीत. तरुण पिढीचे वाचन, त्यातही मराठी वाचन कमी झाले आहे. त्यामुळे नव्या पिढीशी जोडून घेण्यासाठी लेखक, प्रकाशकांनीही नव्या पिढीच्या तंत्रज्ञानाशी जोडून घेतले पाहिजे. प्रकाशनातही वेगळे प्रयोग होणे आवश्यक आहे,' असे अभ्यंकर म्हणाल्या.

'मराठी पुस्तकांनाही उत्तम मागणी आहे; परंतु ती वाढण्यासाठी, साहित्य चळवळ रुजण्यासाठी लेखक, प्रकाशक आणि विक्रेत्यांनी काही वेगळे प्रयोग करणे आवश्यक आहे. साहित्य प्रसाराच्या चळवळीतील 'हितशत्रू' दूर झाल्यास चळवळीला गती मिळेल,' असे राठिवडेकर म्हणाले.

'साहित्याने खपाऊ आणि टिकाऊ याचा सुवर्णमध्य साधला पाहिजे. मधल्या काळात वाचकांची अभिरूचीही बदलली आहे. नव्या साहित्यिकांना जुन्या फूटपट्ट्या लावणे योग्य नाही. साहित्य विश्वातील संवाद वाढवणे आवश्यक आहे. भौतिक समृद्धीइतकेच साहित्यिक, सांस्कृतिक समृद्धीलाही महत्त्व देणे गरजेचे आहे,' असे प्रा. जोशी यांनी सांगितले.

'मराठी पुस्तकांना ग्रामीण भागासह सर्वत्र चांगली मागणी आहे. नवमाध्यमे ही आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. त्यांचा वापर करून आपण सर्वांना साहित्य उपलब्ध करून दिल्यास मराठी साहित्य आणखी समृद्ध होईल,' असे लिमये म्हणाल्या.